## नि. ७९ खालील आदेश
(दि.३०/०४/२०२४)

अर्जदार हिने प्रस्तुत मुळ अर्ज वि.प.विरुध्द कौटुंबिक हिंसाचार प्रतिबंध कायदया अंतर्गत दाखल केलेला आहे. वि.प. क्र. ४ यांनी प्रस्तुतचा अर्ज त्यांचे नाव अभिलेखावरुन कमी करण्याकरीता दाखल केलेला आहे.

२. वि.प. क्र. ४ यांचे प्रस्तुत अर्जाचे कामी असे कथन आहे की, प्रस्तुतचे कामी दि. २०/०३/२०२४ रोजी अर्जदार तर्फे साक्षीदार क्र. १ यांचा उलटतपास घेणेवर तारीख नेमलेली आहे. मुळ अर्जदार या वारंवार गैरहजर राहत असल्यामुळे उलटतपास होणेस विलंब होवुन प्रस्तुतचे प्रकरण साधारणतः सात वर्षापासुन प्रलंबीत आहे. जाबदेणार यांनी अर्जदार यांना प्रस्तुतचे प्रकरण चालवण्यात स्वारस्य नसल्यामुळे प्रस्तुतचा अर्ज काढुन टाकणेबाबत नि. ७१ वर केलेला अर्ज दि. १४/०६/२०२३ रोजी नामंजुर करण्यात आलेला आहे. जाबदेणार क्र. ४ यांचेविरुध्द अर्जदार यांना प्रस्तुतचा अर्ज दाखल करण्याकरीता कोणतेही कारण घडलेले नाही. जाबदेणार क्र. ४ यांनी अर्जदार हिचा कोणताही मानसीक व शारिरीक छळ केलेला नाही. जाबदेणार क्र. ४ मनोज मोहन जगताप हे इंडीयन आर्मी मध्ये सैनिक म्हणुन नोकरीस होते ते नुकतेच दि. ३१/०१/२०२१

मध्ये सेवानिवृत्त झालेले आहेत असे असताना दरम्यानचे कालावधीमध्ये महाराष्ट्र पोलिस मुंबई विभाग येथे जाबदेणार क्र. ४ हे पोलिस शिपाई म्हणुन नेमणुकीस पात्र झालेले आहेत. त्यानुसार जाबदेणार क्र. ४ यांची कागदोपत्री पडताळणी सुरू आहे. प्रस्तुतचा अर्ज जाबदेणार क्र. ४ यांचे विरुध्द प्रलंबीत असल्याने जाबदेणार क्र. ४ यांना महाराष्ट्र पोलिस म्हणुन नेमणुक देण्यास संबंधीत खात्याने असमर्थतता दर्शवली आहे. असे असताना जाबदेणार क्र. ४ यांचे नाव प्रस्तुत प्रकरणामधुन वगळणे संयुक्तीक ठरणार आहे. जाबदेणार क्र. ४ हे दि. २७/०१/२००४ रोजी भारतीय सैन्य दलामध्ये रुजु होवुन दि. ३१/०१/२०२१ रोजी सेवानिवृत्त झालेले आहे. दरम्यानचे कालावधीमध्ये वेगवेगळया ठिकाणी सेवा बजावत असताना जाब देणार क्र. ४ हे ठराविक सुटटी करीता त्यांचे घरी येत असे. त्यावेळी जाबदेणार क्र. ४ अथवा त्यांचे कुटूंबियांनी अर्जदार हिला कोणताही मानसीक व शारिरीक त्रास दिलेला नाही. जाबदेणार क्र. ४ हे सुट्टीवर आले असता त्यांचे आई समोर अर्जदार यांचे माहेरी पाटस येथील त्यांचे घरी अर्जदार व तिचे बाळास पहायला गेले होते त्यावेळी अर्जदार व त्यांचे माहेरच्या लोकांनी जाबदेणार क्र. ४ व त्यांचे आईस अपमानास्पद वागणूक दिली. अर्जदार यांनी त्या अनुषंगाने अर्जाचे कलम ७ मध्ये मजकुर नमुद केला आहे. वास्तविक पाहता अर्जदार यांनी अर्जामध्ये नमुद केल्याप्रमाणे कोणतीही धमकी अथवा आरेरावीची भाषा जाबदेणार क्र. ४ यांनी अर्जदार यांना वापरलेली नव्हती. जाबदेणार क्र. ४ यांचेवर त्यांची पत्नी व दोन मुले

यांची जबाबदारी आहे. त्यांना दुसरे उत्पन्नाचे साधन नाही त्यामुळे जाबदेणार क्र. ४ यांना नोकरीची नितांत आवश्यकता आहे. जाबदेणार क्र. ४ यांचेकडुन अर्जदार यांना कोणताही मानसीक व शारिरीक छळ झालेला नसल्याने तसेच मुळ अर्जामध्ये अर्जदार यांनी मागणी केल्यानुसार यदाकदाचित मंजुर झाल्यास त्याबाबतची पुर्तता अर्जदार हिचे पती म्हणजेच जाबदेणार क्र. १ त्यामुळे अर्जदार हिचे कोणतेही नुकसान होत नाही. सबब अर्जदार यांचा प्रस्तुतचा अर्ज मंजुर करण्यात यावा.

३. अर्जदार यांनी प्रस्तुत अर्जास पुरेपुर संधी देवुनही म्हणणे दाखल केले नसल्याने प्रस्तुतचा अर्ज मुळ अर्जदारांच्या म्हणण्याशिवाय चालवणेबाबत दि. ०८/०४/२०२४ रोजी आदेश पारीत करण्यात आलेला आहे.

४. अभिलेखावरील कागदपत्रांचे अवलोकन केले. जाबदेणारतर्फे विद्वान विधीज्ञांचा युक्तिवाद ऐकला. वि.प. यांचे म्हणण्याप्रमाणे दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश १ नियम १० प्रमाणे प्रस्तुत मुळ अर्जातील वि.प.क्र. २ ते ७ हे आवश्यक पक्षकार नसल्याकारणाने त्यांना मुळ दाव्यातुन वगळण्यात यावे. अर्जदार यांचे कथनाप्रमाणे दिवाणी प्रक्रिया संहितेमधील तरतुदी या कौटुंबिक हिंसाचार प्रतिबंध कायदयास लागु नाहीत. याकरीता वि.प. यांनी अभिलेखावर मा. नामदार सर्वोच्च न्यायालय व उच्च न्यायालय यांचे न्यायनिवाडे दाखल केलेले आहेत. त्यातील

निष्कर्षांचा विचार करता दिवाणी प्रक्रिया संहितेमधील तरतुदी या प्रस्तुत अर्जास लागु असल्याचे प्रथमदर्शनी दिसुन येते.

५. प्रस्तुतचा अर्जाचे कामी दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश १ नियम १० प्रमाणे कोणताही अर्ज निकाली काढत असतांना मुळ दावा अथवा मुळ अर्ज व त्यातील कथनांचा विचार करणे गरजेचे असते. तसेच सदर कथनांद्वारे प्रथमदर्शनी जे पक्षकार आवश्यक आहेत, त्यांना दाव्यात अथवा मुळ अर्जात सामील करणे गरजेचे असते. त्यामुळे प्रस्तुत कामातील नि.०१ चे अवलोकन केले असता व दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश १ नियम १० मधील तरतुदींचा विचार करता असे दिसुन येते की, जाबदेणार क्र. ४ यांचा अर्जदार यांचेशी नातेसंबंध आहे, परंतु जाबदेणार क्र. ४ यांचेबाबत अर्जदार यांनी अर्जाचे कलम ७ मध्ये नमुद केलेल्या मजकुरावरुन जाबदेणार क्र. ४ हे अर्जदार हिचे माहेरी गेले असता त्यांनी अर्जदार हिचे वडीलांना अरेरावीची भाषा वापरली असे कथन केल्याचे दिसुन येते. वर नमुद मजकुराशिवाय अर्जदार यांनी जाबदेणार क्र. ४ यांचेकडुन अर्जदार हिचा कौटुंबिक छळ झालेबाबत कोणतेही कथन अर्जाचे कामी नमुद केलेले नाही. जाबदेणार क्र. ४ यांच्या नोकरीचे स्वरुप पाहता जाबदेणार क्र. ४ हे अर्जदार हिचा कौटुंबिक छळ करण्याकरीता त्यांच्या एकत्रीत कुटूंबामध्ये कमी कालावधीकरीता येत असल्याचे दिसुन येते. असे असताना जाबदेणार क्र. ४ यांचेविरुध्द अर्जदार यांचे अर्जामध्ये

तसेच दाखल कागदोपत्री पुराव्यावरुन अर्जदार यांचा जाबदेणार क्र. ४ यांचेकडुन कौटुंबिक हिंसाचार झाल्याचे प्रथमदर्शनी दिसुन येत नाही. अर्जदार यांचा मुळ अर्ज मंजुर झाल्यास मंजुर होणारी मागणी पती या नातयाने जाबदेणार क्र. १ यांना पुर्तता करावी लागणार आहे. असे असताना अर्जातील मजकुरानुसार जाबदेणार क्र. ४ यांना त्यांचे उत्पन्नाचे साधन म्हणुन महाराष्ट्र पोलिस सेवेमध्ये रुजु होण्याकरीता आवश्यक पडताळणी कामी जाबदेणार क्र. ४ यांचेविरुध्द मुळ अर्जामध्ये कोणताही कौटुंबिक हिंसाचारास पात्र मजकुर नसताना त्यांना अर्जाचे कामी आवश्यक पक्षकार नसल्याने मुळ अर्जामधुन वगळल्यास अर्जदार यांचे कोणतेही नुकसान होणार नाही. सबब जाबदेणार क्र. ४ यांचा प्रस्तुतचा अर्ज मंजुर होणे न्यायोचित ठरते. त्यामुळे मी पुढील आदेश पारीत करत आहे.

## आ दे श

१. जाबदेणार क्र. ४ यांचा अर्ज मंजुर करण्यात येतो.

२. जाबदेणार क्र. ४ हे प्रस्तुत अर्जात आवश्यक पक्षकार नसल्याने त्यांना दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश १ नियम १० प्रमाणे वगळण्यात येते.

दिनांकः– ३०.०४.२०२४ (ए.जी.कुलकर्णी)
ठिकाणी– दौंड प्रभारी प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, कोर्ट क्र. ३ दौंड
ता. दौंड, जि. पुणे